# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः31.08.2025** **वारःरविवार**

---

1) 25 व्या शांघाय शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान चीनमध्ये दाखल
2) सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या विकास दरात एप्रिल ते जून तिमाहीत लक्षणीय वृद्धी
3) पंतप्रधान आज आकाशवाणीवरून करणार मन की बात
4) २५ व्या राष्ट्रकुल वरिष्ठ भारतोलन अजिंक्यपद स्पर्धेत भारत पदकतालिकेत अव्वल स्थानी आणि
5)१६ व्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत ५० सुवर्ण पदकं पटकावत भारताची ऐतिहासिक कामगिरी

**<u>मोदी-जपान-चीनदौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल आपला जपानचा दौरा आटोपून शांघाय सहकार्य संघटनेच्या २५ व्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनमधल्या तियानजिन इथं पोहोचले. तिथं त्यांचं पारंपरिक पद्धतीनं स्वागत करण्यात आलं. आजपासून सुरू होणाऱ्या दोन दिवसीय शिखर परिषदेच्या अध्यक्षस्थानी चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग असणार आहेत. या परिषदेला वीसपेक्षा अधिक देशांचे राष्ट्रप्रमुख आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे १० नेते उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन ह्यांचा ह्या परिषदेत प्रमुख सहभाग आहे. या परिषदेत प्रादेशिक सुरक्षितता, दळणवळण, शाश्वत विकास आणि जागतिक सहकार्य यासारख्या मुद्द्यांवर पंतप्रधान मोदी देशोदेशीच्या नेत्यांबरोबर चर्चा करतील. शांघाय सहकार्य संस्थेच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा, तसंच १० वर्षांच्या विकास धोरणावरही या परिषदेत चर्चा होईल.
तत्पूर्वी आपल्या जपान दौऱ्यात पंतप्रधानांनी टोकियोमधल्या १६ प्रांतांच्या राज्यपालांना संबोधित केलं. जपानच्या विविध राज्यपालांना आणि भारतीय राज्य सरकारांना भागीदारी उपक्रमाचा लाभ घेण्याचं आणि उत्पादन, तंत्रज्ञान, नवोन्मेष, गतिशीलता, पायाभूत सुविधा, स्टार्ट-अप आणि एमएसएमई क्षेत्रात भागीदारी निर्माण करण्याचं आवाहन केलं. त्यानंतर जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा शिंकानसेन यांच्या समवेत पंतप्रधान मोदी बुलेट ट्रेननं, मियागी प्रांतातील सेंदाई इथं गेले. तिथल्या सेमीकंडक्टर उत्पादन उपकरणांच्या प्रमुख कारखान्याला त्यांनी भेट दिली.

इंट्रो :

२०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या एप्रिल ते जून या तिमाहीत भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनाच्या दरात वाढ होऊन तो ७ पूर्णांक ८ दशांश टक्के झाला आहे. गेल्या पाच तिमाहींतील हा उच्चांक आहे. हा दर साडे सहा टक्के राहील असा अंदाज रिझर्व्ह बँकेनं पतधोरण आढावा समितीच्या बैठकीत वर्तवला होता.

**<u>रिझर्व्हबँक-गव्हर्नर</u>**

भारत लवकरच जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केला. प्रधानमंत्री जनधन योजनेचा देशाच्या विकासामध्ये मोठा वाटा असल्याचं मल्होत्रा यांनी सांगितलं. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या विकास दरात या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत लक्षणीय वृद्धी झाल्याच्या पार्श्वभूमीवर ते इंदूरमध्ये संतृप्ती शिबिर या कार्यक्रमात बोलत होते.

आर्थिक विकासदरात ७ पूर्णांक ८ टक्के वाढ झाल्याबद्दल तज्ज्ञांनी समाधान व्यक्त केलं आहे. पहिल्या तिमाहीत दर्शवलेल्या मजबूत आणि स्थिर वाढीला प्रभावी धोरण आणि देशांतर्गत बाजारपेठेतील वाढती मागणी कारणीभूत ठरत असल्याचं असोचेमचे अध्यक्ष संजय नायर यांनी म्हटलं आहे. तर ही वाढ अनुमानापेक्षा लक्षणीय असून,हा एक सकारात्मक संकेत असल्याचं अर्थशास्त्रज्ञ प्राध्यापक यशवीर त्यागी यांनी म्हटलं आहे. पुण्यातील एक अर्थतज्ज्ञ भरत फाटक यांनी आकाशवाणीशी बोलताना या दरवाढीबद्दल प्रतिक्रिया दिली.

**<u>मकीबा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमात आपले विचार मांडतील. मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १२५ वा भाग असेल. हा कार्यक्रम संपूर्ण आकाशवाणी आणि दूरदर्शन नेटवर्क, आकाशवाणी न्यूज वेबसाइट आणि न्यूजएअर मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. हिंदी प्रसारणानंतर आकाशवाणी हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित करेल.

**<u>हुतीसरकार</u>**

येमेनच्या हुती समर्थित सरकारचे पंतप्रधान अहमद अल-रहावी आणि इतर अनेक मंत्र्यांचा राजधानी सना इथं झालेल्या इस्रायली हवाई हल्ल्यात मृत्यू झाला असल्याचं हुती गटानं म्हटलं आहे. सरकारच्या कार्यावर पुनरावलोकन करणाऱ्या कार्यशाळेदरम्यान हे अधिकारी मारले गेले. यामध्ये इतर अनेक मंत्री जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर ,सरकारनं कार्यरत राहण्याचा संकल्प केला असून लवकरच इस्रायलविरुद्ध कारवाई करण्याचा निश्चय केला आहे. हुती गटाने हल्ल्यातल्या मृत्यू संदर्भात नकार दिला होता, मात्र या हल्ल्यामुळे हुती गटावर मोठा आघात झाला आहे. हुती गटानं 2014 मध्ये सनावर ताबा मिळवल्यानंतर येमेन सरकारला अदान मध्ये निर्वासित व्हावं लागलं होतं.

**<u>रशियायुक्रेन</u>**

रशिया - युक्रेन संघर्षावर युरोपीय देशांनी सुचवलेल्या तहातलं कलम युक्रेनने फेटाळलं आहे. रशिया आणि युक्रेनियन सैन्यादरम्यान ४० किलोमीटर लांबीचा जमिनीचा पट्टा बफर झोन म्हणून ठेवण्याचा प्रस्ताव अवास्तव असून त्यात युक्रेन कडून भूभाग हिरावून घेतला जाईल असं युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी म्हटलं आहे रशियाने या प्रस्तावाला सशर्त सहमती दर्शवली असली तरी कोणत्याही तडजोडीपूर्वी रशियन सैन्याची युक्रेनच्या भूमीवरुन पूर्णपणे पीछेहाट अपरिहार्य राहील असं युक्रेनने सांगितलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. यावेळी रशिया युक्रेन संघर्ष तसंच द्विपक्षीय संबंधांवर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

**<u>राजनाथ</u>**

संरक्षण उत्पादनांच्या क्षेत्रात आपला भर स्वयंपूर्ण होण्यावरच असेल, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नॉयडा इथं एका कार्यक्रमात सांगितलं. एका खाजगी विमान इंजिन चाचणी सुविधेचं उद्घाटन सिंह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. संरक्षण सज्जतेच्या बाबतीत ,सुधारित उत्पादने आपणच तयार करणं गरजेचं आहे आणि त्यासाठी आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून राहू शकत नाही असं ते म्हणाले. प्रस्तावित सुदर्शन चक्र हवाई संरक्षण प्रणाली अंतर्गत सरकार पुढील दहा वर्षांत देशातील सर्व महत्त्वाची ठिकाणे आणि संस्थांना संपूर्ण हवाई सुरक्षा प्रदान करेल, अशी ग्वाही संरक्षण मंत्र्यांनी दिली.

**<u>अमितशहा</u>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज अहमदाबादमध्ये नागरी आरोग्य केंद्रांचं उद्घाटन करणार आहेत. दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यात ते काही वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. आज सकाळी लाल दरवाजा इथल्या भद्रकाली माता मंदिरात दर्शन आणि पूजा केल्यानंतर 2 नागरी आरोग्य केंद्रांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल.

**<u>भारतोलन</u>**

अहमदाबाद इथं झालेल्या २५व्या राष्ट्रकुल वरिष्ठ भारतोलन अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावलं. ४ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कास्य अशी एकंदर १३ पदकं भारतीय स्पर्धकांनी मिळवली. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी मेहेक शर्मानं एकंदर २५३ किलो वजन उचलून सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी करत रौप्यपदकावर नाव कोरलं, तर लव्हप्रीत सिंहनं एकंदर ३८० किलो वजन उचलून कास्यपदक मिळवलं.

**<u>नेमबाजीस्पर्धा</u>**

कझाकस्तानमधल्या शिमकंद इथं झालेल्या १६ व्या आशियाई नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ५० सुवर्ण पदक पटकावून भारतानं अजिंक्यपदाच्या इतिहासात पहिल्यांदाच पदकांच्या यादीत अव्वल स्थान प्राप्त केलं आहे. २६ रौप्य आणि २३ कास्य पदकांसह भारत 99 पदकांवर पोहोचला आहे. स्पर्धेत कझाकस्तान दुसऱ्या तर चीन तिसऱ्या स्थानावर आहे. भारताच्या

अंकुर मित्तलने कालच्या पुरुषांच्या डबल ट्रॅप स्पर्धेत विक्रमी कामगिरी करत सुवर्ण पदक जिंकले. महिलांच्या वरिष्ठ संघाच्या कामगिरीत एलावेनील वालारिवनने एअर रायफलमध्ये दुसरा आशियाई किताब जिंकला. तिने अरुण बाबुतासह मिश्र स्पर्धेत सुवर्ण पदक जिंकलं. नीरू ढांडानं महिला ट्रॅप स्पर्धेत पहिलं सुवर्णपदक पटकावलं तर सिफ्त कौर सामरानं महिलांच्या 50 मीटर रायफल थ्री-पोजिशन मध्ये तिचं वैयक्तिक पहिलं पदक मिळवलं. मनू  भाकर नं 3 कास्य पदकं पटकावली. या स्पर्धेत 15 स्पर्धांमध्ये  35 खेळाडू सहभागी झाले होते.

**<u>पाऊसपंजाबहिमाचल</u>**

पंजाबमध्ये होत असलेल्या  मुसळधार पावसामुळे परिस्थिती गंभीर झाली आहे. रावी, ब्यास आणि सतलज या नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहात आहेत. रावी नदीतून काल 14 लाख क्यूसेकपेक्षा जास्त पाण्याचा विसर्ग करण्यात आला. पूरग्रस्त भागातल्या नागरिकांच्या अडचणी वाढत असून अमृतसर, गौरदासपूर, कपूरथला, फिरोजपूर आणि इतर पूरग्रस्त जिल्ह्यात युद्ध स्तरावर  बचाव आणि मदत कार्य सुरू आहे. उद्या पर्यंत पंजाबच्या काही भागात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे.

हिमाचल प्रदेशातल्या विविध भागात सातत्यानं सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन होत असून दळण वळण प्रभावित झालं आहे. प्रशासनानं चंबा जिल्ह्यातल्या  मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे अडचणीत सापडलेल्या यात्रेकरूंचा यशस्वीरित्या बचाव केला आहे. सरकारी आकड्यानुसार, भर्मौर भागात अजूनही ५,००० यात्रेकरू अडचणीत आहेत. मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू यांनी काल भर्मौरची हवाई पाहणी केली. राज्यातील अनेक भागांमध्ये २ सप्टेंबरपर्यंत मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागांनं दिला आहे.

शेवटी पुन्हा ठळक बातम्या

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार